सत्र प्रकरण क्रमांक ५२/२०२२
निशाणी क्रमांक ५० /क

सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०२ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नांव :— लता अशोक जमदाडे

वय :— ५० वर्षे व्यवसाय :— शेती

राहणार :— कामखेडा ता. जि. बीड

---

**सरतपासणी { ॲड.एन. ए. ताडेवाड सहा.सरकारी वकील }**

०१. फिर्यादी अशोक जमदाडे हे माझे पती आहेत. मयत अनिल हा त्यांचे पहिले पत्नीचा मुलगा होता. मी न्यायालयासमोरील या आरोपींना ओळखते. आरोपी अर्चना ही माझी सुन आहे. एक आरोपी तिचा मामा असुन दुसरा मामाचा मुलगा आहे. अनिलचे लग्न अर्चनासोबत १५ वर्षापुर्वी झालेले आहे. त्यांना दोन मुली आहेत. त्यांचे नवराबायकोचे आपसात किरकोळ भांडणे व्हायचे. ति पहिल्यांदा माहेरी गेली व सात आठ महिने नांदायलाच आली नाही. अनिल व त्याचे वडील तिला आणायला जायचे व नांदायला घेवुन यायचे. त्यानंतर त्या दोघांना वेगळे ठेवले. त्यांना रहायला दोन खोल्या दिल्या. तसेच दोन एक्कर शेती सुध्दा दिली. त्यानंतर तिने ती शेती मुलाकडुन तिचे नावावर करुन घेतली. त्यानंतर ती पुन्हा भांडण करुन माहेरी गेली. परत आंम्ही तिला आणायला गेलो. त्यांनी तिला नांदायला पाठवले नाही व मामाकडे जावुन विचारायला सांगितले व आंम्ही तिला नांदवायला पाठवत नाही असे म्हणाले. त्यामुळे माझे मुलाने टेन्शन घेतले. त्याने त्याच दिवशी संध्याकाळी तिला फोनसुध्दा लावला होता. माझे दुसरे मुलाला कावीळ झाला होता. त्यामुळे आंम्ही घरात झोपलो होतो. त्यानंतर रात्री त्याचे वडीलांना त्याने गळफास घेतलेला दिसला. त्याने बायकोच्या त्रासाला कंटाळुन आत्महत्या केली. आज रोजी अर्चना व तिचा मामाचा मुलगा न्यायालयात हजर आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे श्री पी. बी. राख वकील—**

२. माझे माहेर समनापुर आहे. माझे माहेरचे आडनाव शेळके आहे. शाम शेळके हे माझे भावकीतील नातेवाईक आहेत. हे म्हणणे खरे आहे शाम शेळके यांच्या मध्यस्थीने अनिलचे व अर्चनाचे लग्न जमले होते. माझे शिक्षण झाले नाही. मी अडाणी आहे. हे

म्हणणे खरे आहे की माझा दुसरा मुलगा गणेश व अनिल याचेमध्ये चार ते पाच वर्षाचे अंतर आहे. हे म्हणणे खरे आहे की गणेश हा पुणे येथे नोकरी करतो. हे म्हणणे खरे आहे की माझे दोन्ही मुले गणेश व अनिल हे हुशार होते. अनिलचे शिक्षण डी.एड. झालेले होते. हे म्हणणे खरे आहे की पोलीसांनी माझा जबाब केंव्हा घेतला हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की मी बाईमाणुस असल्याने मी पोलीसांशी बोलले नाही. जे काही बोलले ते पुरुषच बोलले. हे म्हणणे खरे आहे की मला आज न्यायालयात साक्षीपुर्वी सरकारी वकीलांनी माझा जबाब वाचुन दाखवला व त्यानंतर मी साक्ष दिली. मी पोलीसांना पहिल्यांदा अर्चना माहेरी गेली, सात आठ महिने नांदायला आली नाही हे सांगितले नंव्हते. अनिल व त्याचे वडील अर्चनाला आणायला जायचे व त्यानंतर त्यांना वेगळे ठेवले, त्यांना शेती व खोल्या दिल्या इत्यादी मजकुर तसचे ती पुन्हा भांडण करुन माहेरी गेली, आम्ही परत आणायला गेली इत्यादी हे मी पोलीसांना सांगितले नंव्हते. तसेच अनिलने तिला फोन लावला होती इत्यादी मजकुर पोलीसांना सांगितला नंव्हता. हे म्हणणे खरे आहे की मी आज रोजी सदर घटनेची माहिति पहिल्यांदाचा कोर्टात सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की अनिल हा हुशार व समजुतदार पण हळवा होता. हे म्हणणे खरे आहे की त्याला शिकलेली बायको करावी वाटत होती. तो नाराज होवुन लग्नानंतर गणेशकडे गेला होता हे माझे लक्षात नाही. हे म्हणणे खरे आहे की अनिलला सरकारी नोकरी लागली नंव्हती. हे म्हणणे खरे नाही की त्याला सरकारी नोकरी लागली नाही, बायको मनासारखी मिळाली नाही म्हणुन अनिल टेन्शनमध्ये होता. हे म्हणणे खरे नाही की अनिल त्याचे बायकोला फोन करत नव्हता. अनिलने त्या दिवशी त्याचे मोबाइलवरुन अर्चनाला फोन केला होता हे मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की मी व माझा मुलगा घटनेचे दिवशी गच्चीवर झोपलो होतो. हे म्हणणे खरे आहे की वरुन जिन्याने खाली यावे लागते. हे म्हणणे खरे आहे की घटनेचे दिवशी माझे पतीने आवाज दिल्यावर मी खाली आले. हे म्हणणे खरे आहे की अनिल व त्याचे पत्नीचे भांडण झाले म्हणुन मी व माझे पतीने कोठेही तक्रार दिली नव्हती. तसेच तिला माहेरी गेली म्हणुन नोटीस सुध्दा पाठवली नंव्हती. हे म्हणणे खरे आहे की अनिलला केव्हा शेती वाटुन दिली होती तसेच केव्हा त्याचे बायकोचे नावावर झाली याबाबत मला सांगता येणार नाही. तसेच मी त्याबाबतचे कागद सुध्दा पाहिले

<u>सत्र प्रकरण क्रमांक ५२/२०२२</u>
<u>निशाणी क्रमांक ५० /क</u>

नाहीत. हे म्हणणे खरे नाही की अनिला हा टेन्शन घेत होता व त्याला दारुचे व्यसन लागले होते. हे म्हणणे खरे नाही की अनिलचे व्यसन सुटावे म्हणुन त्याची बायको त्याला दवाखान्यात घेवुन जायची. मला माझे पतीचे नावावर किती शेती आहे याची माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की अनिल हा व्यसनाचे आहारी गेला होता. हे म्हणणे खरे नाही की त्याला शेतीचे अथवा नोकरीचे कोणतेही उत्पन्न नंव्हते. हे म्हणणे खरे नाही की त्याच नैराश्यातुन त्याने आत्महत्या केली. हे म्हणणे खरे नाही की माझे मुलाने त्याचे पत्नीचे त्रासाला कंटाळुन आत्महत्या केली तसेच इतर सरतपासातील मजकुर मी खोटा सांगते. मला काठोडयाला अर्चनाचे शेजारी कोण रहाते हे सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की मी खोटी साक्ष देत आहे.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृती,

***sd./-***

**( रेणूका मा. सातव )**
अतिरीक्त सत्र न्यायाधीश, बीड

दिनांक : ०९/०४/२०२६